# जन वाचन आंदोलन



जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आज गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोचत नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किंमती परवडत नाहीत. अशा नववाचकांपर्यंत पुस्तके पोचवण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समितीने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किंमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

या आंदोलनातून काय साध्य होईल?

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. साक्षरता आंदोलनातून हस्तगत केलेली अक्षरकौशल्ये लोक स्वत: विकसित करू शकतील. त्यांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.

देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.




भारत ज्ञान विज्ञान समिती
किंमत रु. २-५०

# दुनिया सर्वांची

कवी : सफदर हाश्मी
रूपांतर : वंदना भागवत



भारत ज्ञान विज्ञान समिती

पुस्तकाचे नाव : दुनिया सर्वांची

कवी : सफदर हाश्मी
रुपांतर : वंदना भागवत

चित्रकार : बिंदिया थापर

निर्मिती सहाय्य : विनया देशपांडे/अमित नारकर

जवाआं/३२

प्रकाशन : जून १९९७

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समिती तर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित

मूल्य : २ रुपये ५० पैसे

© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ, पुणे ४११०३०
फोन : ४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४११००४

अक्षर जुळणी व मांडणी : दिनानाथ मनोहर

# ५. दुनिया सर्वांची



अकबर राजा प्रसिद्ध मोठा
सगळे म्हणती खूपच शहाणा
सर्वांना तो सांगत असे
आपल्या शहाणपणाचे किस्से
'आम्ही पाह्यले आहे जग सारे
पाह्यले आहेत चंद्र व तारे.
पर्वत, डोंगर, नद्या झरे'
मैदाने, सागर अन किनारे
गावे, गल्ल्या, खेडी, शहरे
झोपड्या, वस्त्या आणि घरे.
पाह्यली प्रजा, राजे पाह्यले
कोणते कोणते वीर पाह्यले.
ढोल, झांजा, ताशे पाह्यले
नाटक आणि तमाशे पाह्यले.
राजनीतीचे पेच पाह्यले
साधू आणि भोंदू पाह्यले.
नजर जिथे वळली आमची
सत्ता असे आमची तेथे.
इंच इंच या भूमीचे आम्ही
राजाधिराज असु येथे.



अकबराच्या दरबारी त्या
एक शहाणा बिरबल असे
छोटासा व लहानखुरा पण
चातुर्य जगाचे त्याच्यापाशी असे
हुषार मोठा, लगेच समजला
राजाचा आजार त्याला.
अहंकाराने अकबर राजा
कळले त्याला फुगून गेला.



असाच एकदा राजा जाई
किल्ल्यावर माराया चक्कर
फिरता फिरता सावध तो होई
पायाला बसता ठोकर.
पाहून साधूला एका
निवांत पडलेला तिथे
लाथ मारूनी उठवी त्याला
राजा अकबर संतापाने
गरजला क्रोधाने, '' ऊठ थेरड्या
कसा लोळतो इथे?

या मातीच्या कणाकणावर
माझाच हक्क असे
गवताची काडीही इथली
माझ्या अधिकाराने हले. ''
किलकिले आपले करून डोळे
साधू आपले कान खाजवे
मान झटकूनी नाकही मुरडे
आळस देऊन हात पसरे
पायाची मोडूनी दाही बोटे
डोळे मिचकावून तो बोले,
''जय शिवशंकर जय बम भोले!
बिलकुल मला माहित नसे
येथील काडीकाडीवर म्हणसी
तुझाच केवळ अधिकार असे?
जय शिवशंकर जय बम भोले!
हा तुझा अहंकार असे!''
मिशा पिळत अकबर बोले,







''उचल तुझी कुबडी, झोळी
चालता हो इथून आधी.

झाडांची पाने, गवताची काडी
मधमाशांची सगळी पोळी
फत्तेपूरच्या सगळ्या भिंती
सर्व मनोरे सगळ्या घुमटी
सगळी दारे प्रत्येक खिडकी
यावर सत्ता केवळ माझी
नवे, जुने, ताजे शिळे
सारे दगड, माती खडे
सगळे माझे, सगळे माझे.''
कुरवाळीत दाढी अपुली
आश्चर्यचकित नजरेनी
घसा हलकेच खाकरूनी
साधू राजाला विचारी,
''असेल आपली परवानगी जर
विचारतो प्रश्न, द्यावे उत्तर
फत्तेपूरात रहात असता
किती वर्षे झाली आपल्याला?'
राजा बोले, ''इथे जन्मलो मी
इथून पहिली पहाट पाहिली.''



साधू विचारी, ''तुमच्या आधी,
कोण असे इथला राजा
सकाळी ज्याच्यासाठी घडे चौघडा
आणि वाजे शहनाई?''
अकबर म्हणे, ''साधूबाबा
इतके कसे अडाणी? ''

माझ्याआधी राज्य करती
माझे पूज्य पिताजी.''
''त्यांच्याआधी कोणी इथे
सत्ता गाजवली असे?''
''बाबर आजोबा, अरे मूर्खा
जग ज्यांना राजाधिराज म्हणे''
''बाबा,पणजोबांच्या आधी
सगळ्यांच्याही आधी मालक कोण होते?
अन् असतील जर हेच मालक इथले
महाल, बागबगीचे सारे इथेच का राहिले?
जाताना त्यांनी ते बरोबर का नाही नेले?
सगळे असती फक्त प्रवासी
काही काळ जगात येती
चालून आपल्या वाटेवरती
परत आपला रस्ता धरती.
आयुष्यातील रस्ते सगळे
इथेच रहाती, इथेच संपती. ''



अकबर म्हणे, ''खरे असे.
राजा मी एकमेव नसे
साधूबाबा खरे बोलला
हा मोठाच धडा असे.''
साधू वदे मग हसून थोडा,
''किल्ला नव्हे हा तुझा राजा
ही तर केवळ धर्मशाळा
तू असशी पथिक मुक्कामाला.







महाल कशाला - जगच सगळे
केवळ एक धर्मशाळा असे
दूर जवळच्या पांथस्थांना
इथे जरा विसावा मिळे.

कशास गमजा मग कराव्या
सर्व सर्वही माझे केवळ
नाही एकही गोष्ट आपुली
घर असो वा रस्ते निव्वळ.
नाही झाडे, झुडपे जाळी
वा मधमाशांची असोत पोळी
नाही खिडक्या वा दरवाजे
नाही फुले ताजी, शिळी
नाही किल्ल्यांचे हे तट
नाही मनोरे ना घुमट
ना दुनिया ही तुझी न माझी
ना कुणाची
ही बांध खूणगाठ.''
अकबराला सुचेना उत्तर
मनात परंतु समजे बरोबर
सर्वांचे असता हे जग
नाही एकदोघांचे खरोखर.
राजा विचारात पडलेला
साधू आपल्या गालात हसला
डोळे मिचकावून म्हणाला,
''केली थोडी गंमत राजा



साधू बैरागी मी नाही
ओळखले नच बिरबलाला
पण ठेव मनाशी एक गोष्ट ही
नष्ट करशील राज्य तुझे तू
जर इतरांना विसरशील तू.''
अकबर उद्‌गारे ''बिरबल!
तू तर भलताच बिलंदर
मी समजत होतो तुला
साधू बैरागी खरोखर!''





## ६ पेड



या रे या - या ना - या जंगलात.
घाबरू नको
मी या जंगलातलंच एक झाड
तुम्हाला बोलावतोय.
तुम्हाला काही सांगायचंय.
इथे या ना.

या माझ्या खोडाला हात
लावून पहा.
सरळ, मजबूत,
आणि उंच वरती.
माझ्या लवलवत्या फांद्या पहा
आणि अगणित डहाळ्या.
काय? पानं कुठं गेली?
अरे बाबा,
ती तर शिशिराच्या
पानगळीतच गेली.
पण येतील ना
लवकरच फुटतील पुन्हा
माझ्या फांद्या लहडून जातील.
माझी मुळं
दिसणार नाहीत तुम्हाला
पण ती आहेत!





जमिनीच्या खालती
खोलवर पसरलेली.
तीच तर शोषून घेतात
माझी तहान भागवण्यासाठी
माझी पानं सजवण्यासाठी.
बघ, पानं फुटलीसुद्धा!
हिरवेगार माझे कपडे
पण हे काही फक्त
कपडेच नाहीत माझे
माझं पोषणदेखील करतात हे.
हवेतून ओढून घेतात श्वास
आणि सूर्यातून उष्णता
माझं अन्न बनवण्यासाठी.

हे किडे - कीटक
सरपटणारे, उडणारे, खुदखुदणारे
हे सगळे माझे मित्र आहेत.
माझ्या ढलप्यांत, ढोल्यांत, भेगात,
मी यांना संभाळलं आहे.
यांच्या अंड्यांना
हिवाळ्या, उन्हाळ्यापासून
वाचवलं आहे.
यांच्या बाळांना
माझ्या छातीवर झोपवलं आहे.







म्हणून तर खूष होऊन
हे गातात गाणी,
मधुर गीतं
गुणगुण, झिनझिन
आणि नाचतात
दिवस दिवस अंगभर.
रंगीबेरंगी पक्षी येतात माझ्यापाशी.
होतात मित्र माझे
माझ्या डहाळ्यांमध्ये
बांधतात घरटे आपले.
किलबिलतात, गातात,
उडतात, भिरभिरतात.



आपल्या छोट्या छोट्या पिलांना
उडायला शिकवतात.
मला मुलं खूप आवडतात.
मी मुलांना आवडतो.
येतात माझ्या सावलीत
मजा करायला.
माझ्या फांद्यांना लोंबकळायला
करून झुला.

माझी आंबटगोड फळं
लपून छपून खायला.
माझ्याकडे बघा,
या जंगलातल्या
सगळ्याच झाडांवर
प्रेम करा.



तुमचं आमचं नातं किती जवळचं आहे
ठाऊक आहे?
हे जंगल तुम्हा सगळ्यांच्याच किती उपयोग पडतं
माहित आहे?
माझ्या लाकडांपासूनच
बनतात तुमची टेबलं खुर्च्या
तुमचे झोपायचे पलंग
आणि दरवाजे खिडक्या
तुमची पेन्सिलसुद्धा.
शिक्षकांना विचारा
ते सांगतील तुम्हाला
मी पाऊसदेखील पाडतो
मातीची धूप थांबवतो
पुराला रोखतो
दुष्काळ हटवतो.
हे सगळं जंगल किती उपयोगी पडतं तुमच्या!
किती सुख देतं तुम्हाला!
पण नफेखोर व्यापारी
कापून टाकतात झाडे सरसकट बेलगाम
नवीन झाडेही न लावता.
थांबवा - थांबवा
त्या लोभी नफेखोराला थांबवा.
आवरा त्या जंगलकापूला
नाहीतर एखादे दिवशी
संपून जाईल जंगल सारे
शिल्लक राहील स्मशान फक्त
सांभाळत खोडांची कलेवरे.



# सफदर हाश्मी

सफदर हाश्मींनी लहान मुलांसाठी सुंदर कविता लिहिल्या. गोष्टी व नाटके लिहिली. सफदरनां मुलांविषयी जसे प्रेम होते तसेच निसर्गाविषयीहीं खूप प्रेम होते. प्राणी, पक्षी, फुलं, झाडं यांच्यावरील साधी सोपी व विनोदी गाणी त्यांनी लिहिली.स्वातंत्र्य म्हणजे काय हे विनोदी पद्धतीने मुलांना कवितेतून त्यांनी समजावून सांगितले.



सफदरना मुले आणि निसर्गाइतकेच प्रेम होते कष्ट करणाऱ्या माणसांविषयी. त्यांनी महाविद्यालयात शिकत असताना एक पथनाट्याचा गट उभा केला. मशीन, औरत, हत्यारे, राजा का बाजा इत्यादी हिंदी नाटके लिहिली. त्यातून कष्टकऱ्यांचे जीवन दाखवले. त्यांची पिळवणूक कशी होत असते ते लोकांसमोर मांडले. लोकांमध्ये बंधुभाव जागा रहावा व त्यांनी स्वत:च्या हक्कासाठी ठामपणे उभे रहावे असे सफदरना वाटे. त्यासाठी लोकांमध्ये जागृती करणारी नाटके त्यांनी लिहिली. क्रांतीकारी विचार पसरवले.

१ जानेवारी, १९८९ ला दिल्लीजवळ गाझियाबाद येथील कामगार वस्तीत सफदर नाटक करत होते. त्यांच्यावर गुंडांनी हल्ला केला. या हल्ल्यामागे तेथील भ्रष्ट राजकारणी होते. या हल्ल्यात सफदर हाश्मी व त्यांचे सहकलाकार रामबहादूर मारले गेले.

सफदर हाश्मी शहीद झाले.